बुधवार, दि १८ जून २०२५ ● जालना ● वर्ष १२ वे ● अंक ४० वा ● किमंत २ रु. ● पाने ४
RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886
https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

## प्रशासकीय अधिकारी शासन निर्णयाची अंमलबजावणी करत नाहीत - ॲड. मगरे

### दलित आदिवासी भुमिहिन कार्यकर्ता मेळाव्याला प्रचंड प्रतिसाद

**घनसावंगी । प्रतिनिधी** - शिवसेना दलित आघाडीच्या वतीने गेले अनेक वर्षांपासून जनआंदोलनाच्या माध्यमातून रस्त्यावरचा संघर्ष सुरु आहे. मात्र प्रशासकीय अधिकारी दलित आदिवासी भुमिहिन कास्तकारांच्या उदरनिर्वाहाच्या प्रश्नांवर गंभीर नसल्याचे शिवसेना दलित आघाडीचे जिल्हाप्रमुख ॲड. भास्कर मगरे म्हणाले.

घनसावंगी येथील तालुकास्तरीय दलित आदिवासी भुमिहिन कार्यकर्ता मेळाव्यात ॲड. भास्कर मगरे बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेनेचे पंडित भुतेकर, तालुकाप्रमुख चिमणे,देशमुख तसेच दलीत आघाडी उपजिल्हाप्रमुख अण्णासाहेब बलराज, मुख्य संयोजक जयकुमार खरात यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी घनसावंगी- अंबड तालुक्यातील भुमिहिन,कास्तकरांची म ोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जालना जिल्ह्यातील दलित आदिवासी भुमिहिन कास्तपट्टे सन १९६८-६९ पासून वहिती मशागत करुन कुटूंबांचा उत्तर निर्वाह करीत आहेत. शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमानुसार १ एप्रिल १९७८ ते १४ एप्रिल १९९० च्या दरम्यान महाराष्ट्रातील दलित आदिवासी कास्तपट्टे नियमानुकूलित करुन सातबारा देण्याचे शासनाचे आदेश आहेत. मात्र प्रशासकीय अधिकारी लाच घेतल्याशिवाय फाईल हाताळत नाहीत. हा माझा आंदोलनाच्या माध्यमातून आलेला अनुभव आहे. उदाहरण द्यायचे झाल्यास मौजे राम नगर ता. जि.जालना येथील गायरान गट नं. २००मध्ये शासन निर्णय २८ नोव्हेंबर १९९१ अधिनियमानुसार २३ जानेवारी २००६ रोजी जिल्हाधिकारी जालना यांनी उपविभागीय अधिकारी जालना यांना आदेशित करुन मौजे रामनगर येथील गट नं. २०० मधील ४५ लाभार्थ्यांना दंड राशी भरुन त्यांच्या वहिती ताब्यातील जमीनी मोजमाप करुन देण्यात पान ३ वर



## शिवसिंग तिलवारे यांनी स्वखर्चातून बुजवले ढवळेश्वर मार्गावरील खड्डे

### परिसरातील नागरिकांसह वाहनाधारकांना दिलासा



**जालना । प्रतिनिधी** - शहरातील ढवळेश्वर भागात मुख्य रस्त्यावर खड्डे पडले आहेत. या खड्ड्यात पावसाचे पाणी साचल्यामुळे गेली अनेक दिवसांपासून छोट-म ोठे अपघात घडत होते. दोन दिवसांपुर्वी कडबा घेऊन जाणारे लोडींग वाहन या रस्त्यावर उलटले होते. गेले दोन वर्षांपासून हा रस्ता व्हावा यासाठी प्रशासनाकडे मागणी होत आहे. मात्र, कुंभकर्णी झोपेत असलेल्या प्रशासनाला अद्यापही जाग आली नाही. या गंभीर बाबीची सामाजिक कार्यकर्ते शिवसिंग तिलवारे यांनी दखल घेत स्वखर्चातून या रस्त्यावरील खड्ड्यात मुरूम टाकून खड्डे बुजविण्याचे काम केले आहे. महत्त्वाचे म्हणजे काम करत असतांना त्यांनी कोणत्याही प्रकारे शासकीय मदत घेतली नाही हे विशेष. त्यांच्या या कार्यामुळे परिसरातील नागरिकांसह वाहनधारकांना दिलासा मिळाला आहे.

शिवसिंग तिलवारे हे माजी राज्यमंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांचे कट्टर समर्थक आहेत. त्यांच्या उपक्रमाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे.

यावेळी शिवसिंग तिलवारे यांच्यासह अर्जुनभाऊ खोतकर कट्टर समर्थक मित्र मंडळाचे रामसिंग तिलवारे, बळीराम तिलवारे, संदीप आर्डद, केशव खरात, राहुल साने, शुभम चव्हाण, अनिल चव्हाण, गणेश काकडे, गणेश पवार, ऋषी काकडे, सोमनाथ हिवाळे, दिलीप सिंग, ऋषिकेश ढसाळ, कौतूक वाघ, अजय काकडे, दत्ता पवार, विजय जाधव, पवान जगताप, संजय कांबळे, पवन कांबळे, अभिजीत सोळंके, हरिश्चंद्र कनिसे, गणेश चौधरी कृष्णा चौधरी, अनील सिंग, बंटू कुहिरे, शंकर माने, महेश गजर, बालाजी माकोडे आदींची उपस्थिती होती.

## सीटीएमके गुजराती विद्यालयात सर्वाइकल लसीकरण जनजागृती कार्यक्रमाला प्रतिसाद



**जालना । प्रतिनिधी** - कॅन्सर पेशंट एड असोसिएशन, मुंबई यांच्या मार्गदर्शन व सहकार्याने लायन्स क्लब जालना आणि सीव्हील क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या २४ जून रोजी ९ ते १८ वयोगटातील मुलींसाठी मोफत सर्वाइकल कॅन्सर प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबवण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने मंगळवार दि. १७ जून रोजी सीटीएमके गुजराती विद्यालयात आयोजित विशेष जनजागृती कार्यक्रमात ३१० विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

वीरा मेडिसिटी हॉस्पिटलच्या स्थिररोग तज्ञ डॉ. प्रणौती हीरळकर यांनी अत्यंत सोप्या व समजण्याजोग्या भाषेत सर्वाइकल कॅन्सर म्हणजे काय, तो कशामुळे होतो, त्याच्या मागील मुख्य कारणीभूत घटक म्हणजे एचपीव्ही विषाणू काय आहे आणि त्यापासून प्रतिबंधासाठी लस कशी मदत करते, याविषयी सखोल मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थिनींनीही आपल्या मनातील प्रश्न विचारून संवाद अधिक अर्थपूर्ण केला. डॉ. हीरळकर यांनी विद्यार्थिनींना केवळ माहिती दिली नाही तर त्यांच्या म नातील भीती दूर करत लसीकरणाबाबत जागरूकतेचा ठोस पाया रचला.

शाळेच्यावतीने अध्यक्ष रमेशभाई पटेल, विश्वस्त जयश बाविशी, मुख्याध्यापक सतीश देशमुख, प्रकाश देशमुख, विद्या करवंदे, राहुल म्हसलकर यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उत्कृष्ट व्यवस्था व समन्वय साधला. यावेळी लायन्स क्लब जालनाच्या सचिव मंजु श्रीमाली, अतुल लड्ढा, विठोबा दराडे, पी. के. खरात, जयप्रकाश श्रीम ाली तसेच वीरा हॉस्पिटलचे श्री. गाडे आदींची उपस्थिती पान ३ वर

## जालना येथील आयटीआयमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरु

**जालना** - जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत चालु वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून ऑनलाईन अर्ज दि.२६ जुन २०२५ पर्यंत संबंधितांना सादर करता येणार आहेत. अर्ज सादर करण्यासाठी उमेदवारांनी रवाळीीळेप. वीशीं.सीं.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच जालना येथील जनार्दन मामा नागापुरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सोलार टेक्निशियन आणि ड्रोन टेक्निशियन हे दोन नवीन अभ्यासक्रम सुरु होण्याची शक्यता आहे. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## २०१२ च्या आझाद मैदान दंगलीची पुनरावृत्ती टाळण्यासाठी 'पॅलेस्टाईन समर्थन' मोर्च्यावर बंदी घाला! - हिंदू संघटनांची शासनाकडे मागणी

**मुंबई । प्रतिनिधी** - वर्ष २०१२ म ध्ये म्यानमारमध्ये मुसलमानांवर होत असल्याच्या कथित अत्याचाराच्या घटनेच्या विरोधात आजाद मैदान, मुंबई येथे आयोजित मोर्चा दंगलात परिवर्तित झाला होता. 'अमर जवान ज्योती'ची विटंबना, पोलीस व मीडियाच्या गाड्यांची जाळपोळ, सार्वजनिक मालमत्तेची हानी, महिला पोलीस कर्मचाऱ्यांवरील हल्ले अशा घटना घडल्या होत्या. त्याच धर्तीवर १८ जून २०२५ रोजी आजाद मैदानात होणाऱ्या 'गाझा-पॅलेस्टाईन समर्थन' मोर्च्यावर तातडीने बंदी घालावी, अशी मागणी हिंदु राष्ट्र समन्वय समितीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री, पोलीस महासंचालक, तसेच मुंबईचे सहपोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था) सत्यनारायण चौधरी यांच्याकडे केली आहे. त्यांनी 'आम्हाला याची माहिती असून आम्ही योग्य ती कार्यवाही करू', असे आश्वासन दिले.



हे निवेदन सादर करतांना हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे संयोजक सुभाष अहिर, महाराष्ट्र मंदीर महासंघाचे संघटक श्री. विलास निकम, मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिवक्त्या सुरभि सावंत, अधिवक्ता प्रथम ेश गायकवाड, पान ३ वर

युवा आदर्श | जालना | बुधवार, दि १८ जून २०२५ | E-mail- yuva.aadarsh@gmail.com


# संपादकीय

## फ्लाईंग शीख

भारतातीलच नव्हे तर जगातील महान धावपटूत ज्यांची गणना होते असे भारताचे महान धावपटू फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांचा आज स्मृतिदिन. १८ जून २०२१ रोजी मिल्खा सिंग यांचे निधन झाले होते. फ्लाईंग शीख अशी उपाधी मिळालेल्या मिल्खा सिंग यांचा जन्म २० नोव्हेंबर १९२९ रोजी पंजाबातील गोविंदपुरा या गावी एका गरीब शीख कुटुंबात झाला. मिल्खा सिंग यांना लहानपणापासून धावण्याची खूप आवड होती. राष्ट्रीय पातळीवरील धावण्याच्या अनेक स्पर्धांमध्ये त्यांनी यश मिळवले मात्र मिल्खा सिंग प्रकाशझोतात आले ते १९५८ साली. यावर्षी कार्डिफ येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत त्यांनी ४०० मीटरच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. मिल्खा सिंग हे राष्ट्रकुल स्पर्धेत वैयक्तिक प्रकारात सुवर्णपदक जिंकणारे स्वतंत्र भारतातील पहिले खेळाडू होते. त्यानंतर १९५८ च्या टोकियो येथे झालेल्या आशिआई स्पर्धेत मिल्खा सिंग यांनी २०० आणि ४०० मीटर शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. एकाच आतंरराष्ट्रीय स्पर्धेत दोन सुवर्णपदक मिळवणारे ते भारताचे पहिले खेळाडू आहेत. १९६२ च्या जकार्ता आशिआई स्पर्धेतही त्यांनी ४०० मीटर आणि ४ बाय ४०० मीटर रिले शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. १९६० च्या रोम ऑलम्पिक स्पर्धेत मिल्खा सिंग यांचे पदक अतिशय सूक्ष्म फरकाने हुकले. या ऑलिम्पिकमध्ये मिल्खा सिंग यांनी ४०० मीटर शर्यत ४५. ७३ सेकंदामध्ये पूर्ण केली. जर्मनीचा धावपटू कार्ल कुफमॅनपेक्षा ते सेकंदाच्या १०० व्या भाग एव्हढ्या कमी फरकाने मागे राहिले. अतिशय सूक्ष्म फरकाने ऑलिम्पिक पदक हुकल्याने जगभरातील क्रीडाप्रेमींनी हळहळ व्यक्त केली. त्यांचे ऑलिम्पिक पदक हुकले तरी त्यांनी शर्यत पूर्ण केलेली ही वेळ राष्ट्रीय विक्रम ठरली विशेष म्हणजे त्यांचा हा राष्ट्रीय विक्रम ४० वर्ष अबाधित होता. याच स्पर्धेदरम्यान त्यांची भारतीय महिला व्हॉलीबॉल संघाच्या कर्णधार निर्मल कौर यांच्याशी ओळख झाली. ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले आणि त्यांनी विवाह केला. २०२१ सालीच त्यांच्या पत्नीचे कोरोनाने निधन झाले. त्यांचे पुत्र जीव मिल्खा सिंग हे प्रसिद्ध गोल्फपटु आहेत. मिल्खा सिंग यांना फ्लाईंग शीख ही उपाधी पाकिस्तानचे माजी राष्ट्राध्यक्ष जनरल आयुब खान यांनी दिली. १९६० साली पाकिस्तानचा पाकिस्तानचा जगप्रसिद्ध धावपटू अब्दुल खालीक याने आव्हान दिले. मिल्खा सिंग यांनी त्याला पाकिस्तानमध्ये जाऊन हरवले. ते या स्पर्धेत ज्या प्रकारे धावले ते पाहून पाकिस्तानमध्येही ते खूप लोकप्रिय झाले. ही स्पर्धा पाहण्यासाठी जनरल आयुब खान स्वतः हजर होते. या स्पर्धेनंतरच जनरल आयुब खान यांनी त्यांना फ्लाईंग शीख ही उपाधी दिली. भारत सरकाररनेही त्यांना अर्जुन व पद्मश्री पुरस्कार देऊन त्यांचा योग्य गौरव केला. त्यांच्या जीवनावर आधारित भाग मिल्खा भाग हा चित्रपट येऊन गेला. या चित्रपटात फरहान अख्तर यांनी मिल्खा सिंग यांची भूमिका केली होती. मिल्खा सिंग हे भारतातीलच नाही तर जगभरातील धावपटूंचा आदर्श होते. निवृत्तीनंतर त्यांनी तरुण धावपटूंना मार्गदर्शनही केले. मिल्खा सिंग यांचे चार वर्षापूर्वी १८ जून २०२१ रोजी कोरोनाने निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय क्रीडा क्षेत्राची मोठी हानी झाली. फ्लाईंग शीख मिल्खा सिंग यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# जल, स्थल, वायू यावर मानवी अतिरेक वाढल्याने अनेक धोके निर्माण होऊन दुर्घटना होताहेत

दिवसेंदिवस ज्याप्रमाणे अत्याधुनिक सुविधा निर्माण होत आहे त्याच्या दुप्पट विणाशाचे दरवाजे उघडल्याने दुर्घटनांचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.ही स्थिती फक्त भारतातच नसुन संपूर्ण जगभर दिसुन येते.महत्वाचे म्हणजे जगभरातील अनेक देशात २०२५ मध्ये भयावह युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते व अनेक भयावह दुर्घटना पहायला मिळत आहे आणि दुर्घटनांची साखळी सुरूच आहे.म्हणजे आजच्या परिस्थितीत पृथ्वीवरील मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू अत्यंत कठीण परिस्थितीत जगत असल्याचे दिसून येते. आपण म्हणतो की आकाशातील प्रवास (विमानप्रवास) सर्वात सुरक्षित असल्याचे जगजाहीर आहे.परंतु आज विमानतळ दुर्घटनांचे प्रमाणात सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. दिनांक १२ जूनला गुजरात मधील अहमदाबाद विमान दुर्घटना अंत्यंत भयावह होती. विमानाने उडान घेताच ३० सेकंदात एका मेडिकल होस्टेलवर कोसळले यात विमानातील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला व होस्टेलमधील अनेक विद्यार्थींचा मृत्यू झाला व अनेक गंभीररीत्या जखमी झाले.त्यामुळे आता प्रश्न निर्माण होतो की विमानाने प्रवास चांगला की वाईट. आपण हेलिकॉप्टर सुरक्षित समजतो परंतु हेलिकॉप्टरच्या दुर्घटनांचे प्रमाणात सुध्दा वाढले आहे याचे जिवंत उदाहरण म्हणजे दिनांक १२ तारखेला केदारनाथ दर्शनासाठी गेले असता दर्शनानंतर ते आर्यन एव्हिएशनच्या हेलिकॉप्टरने गुप्तकाशीकडे निघाले असताना अचानक हवामान बदलले दाट धुके व अवकाळी पावसामुळे दृश्यमानता कमी झाल्याने हेलिकॉप्टर जंगलात कोसळले यात एकूण ७ प्रवास्यांचा मृत्यू झाला. म्हणजे सध्याच्या परिस्थितीत निसर्ग सुध्दा मानवाच्या अतीरेकाला त्रासल्याचे दिसून येते व त्यामुळे दु:खद घटना घडतांना दिसतात.अशा परिस्थितीत प्रश्न उपस्थित होतो की आपल्यासाठी काय सुरक्षित आणि काय सुरक्षित नाही?मावळ तालुक्यातील प्रसिद्ध कुंडमळा येथे १५ जून रोजी पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.येथील इंद्रायणी नदीवरील असलेल्या ३२ वर्षे जुन्या पुलावर क्षमतेपेक्षा जास्त नागरिकांच्या गर्दीमुळे पुलाचा मधला भाग अचानक कोसळला.सुमारे ३५-४० जण पुलावरून कोसळल्याने जखमी झाले असून चौघांचा मृत्यू झाला ६ जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे आणि नदीचा प्रवाह जास्त असल्याने अनेक जण वाहून सुध्दा गेल्याचे सांगितले जाते.अशाप्रकारे निसर्ग सर्वांचीच गोच्ची करतांना दिसते. २२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथील शांतमय ठिकाणी पर्यटक आनंद लुटण्यासाठी गेले असता अचानक आतंकवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला यात २८ जणांचा निर्घृणपणे हत्या करण्यात आली.म्हणजे आजच्या परिस्थितीत एकांतवास सुध्दा कठीण झाला आहे.याचप्रमाणे दिवसेंदिवस रेल्वेचे सुध्दा अपघात वाढल्याचे दिसून येते.नुकताच मुंबई येथे लोकल ट्रेनचा अपघात झाला यात अनेकांचा बळी गेला.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत मानवजातीसाठी कोणतेही ठीकाण सुरक्षित नसल्याचे दिसून येते.आतातर नौकरीवर जातांना,बाहेर जातांना, पायदळ फिरतांना सुध्दा आपण सुरक्षित आहोत की नाही याचीही शंका निर्माण झाली असून चिंता वाटायला लागली आहे.याहीपलीकडे आपण विचार केला तर देवदर्शन किंवा फिरणेही महागात पडतांना दिसत आहे.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की जाये तो जाये कहा!आतातर इजरायल -इरान युद्ध आरपारचे समजल्या जात आहे यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे सावट निर्माण झाले आहे.कारण युक्रेन-रशिया संघर्ष सुरूच आहे सोबतच अनेक देशात गृहयुद्ध भडकल्याचे दिसून येते.सध्याचे युध्द साधे रहाले नसुन बॉम्ब वर्षाव, ड्रोन हल्ला, मिसाईल अशाप्रकारे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे वापरल्या जात आहे.सध्याच्या परिस्थिती युक्रेन, रशिया, ईरान,इजरायल यांच्या युध्दामुळे सर्वत्र आगीचे सावट दिसून येते.यामुळे लाखोंच्या संख्येने जिवित हाणी होत आहेच सोबतच वित्तीय हानी सुध्दा मोठ्या प्रमाणात होत आहे.म्हणजेच मानवजातीसाठी सध्याचा काळ अत्यंत बिकट,गंभीर व धोकादायक स्थितीत येवून ठेपला आहे. आज पृथ्वीवर होत असलेल्या मानवी अतिक्रमणामुळे हिमकडा कोसळने,ज्वालामुखीचा उद्रेक, सुनामी, भूकंप ढगफुटी,अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी आणि आता युध्दजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेला आगडोंब यामुळे सर्वत्र विणाशलिला दिसून येत आहे.मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी जितक्या सुखसुविधा निर्माण केल्या आहेत त्याचे दुष्परिणाम हळूहळू वाढत असून विनाशाकडे वाटचाल करीत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.या संपूर्ण घटनाक्रमावरून लक्षात येईल की स्थल, वायू,जल, आकाश-पाताळ हे संपूर्ण ठिकाण आज मानवामुळे विणाशाचे कारण बनत आहे व यांमुळेच भयावह दुर्घटना होतांना दिसतात.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# कर्जतच्या क्रिडा संकुलावरुन रंगली राजकीय कुस्ती

## आमदारांचा पाठपुरावा तर विधानपरिषद सभापतींचा खोडा; आ. रोहित पवार यांनी घेतली महसूलमंत्र्यांची भेट

**कर्जत । प्रतिनिधी -** आमदार रोहित पवार यांच्या पाठपुराव्याने कर्जत तालुक्यातील क्रीडा संकुलाच्या अंतिम मान्यतेसाठी महसूल मंत्रालयात आलेली फाईल प्रलंबित असताना ती मंजूर करण्याऐवजी आता या क्रिडा संकुलासाठीची जागाच बदलण्याचा घाट विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी घातला आहे. याबाबत आमदार रोहित पवार यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन जागा न बदलता प्रलंबित असलेली फाईल मंजूर करण्याची मागणी केली आहे.

राज्यात महाविकास आघाडीची सत्ता गेल्यापासून कर्जत-जामखेडमध्ये प्रत्येक विकास कामांत राजकारण रंगत असल्याचे दिसत आहे. आमदार झाल्यानंतर कर्जत-जामखेड मतदारसंघात विविध सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याचा आणि विकासकामे करण्याचा प्रयत्न आमदार रोहित पवार यांच्याकडून होत आहे. यामध्ये रस्त्यांपासून तर विविध शासकीय इमारतींपर्यंत आणि पाणीपुरवठ्यापासून तर आरोग्य सुविधांपर्यंत अनेक गोष्टींचा समावेश आहे. याचाच भाग म्हणून त्यांनी कर्जतमध्ये क्रिडा संकुल उभारणीसाठी ६.३ कोटी रुपयांना मंजुरी आणली. मात्र क्रीडा संकुलासाठी योग्य आणि पुरेशी जागा नसल्याने त्यांनी (बर्गेवाडी) येथील जागा मिळण्यासाठी २०२२ पासून पाठपुरावा केला. त्यानुसार या जागेचा तालुका क्रीडा समितीने जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव दिला. तो विभागीय आयुक्तांकडे पाठवण्यात आला आणि विभागीय आयुक्तांनी तो मंजुरीसाठी शासनाकडे पाठवला. मंत्रालय स्तरावर या प्रस्तावाला क्रिडा, वित्त व नियोजन या तिन्ही विभागाने मंजुरी दिली. त्यानंतर अंतिम मान्यतेसाठी हा प्रस्ताव विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू होण्यापूर्वी तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे गेला, परंतु त्यांनी यावर कोणताही निर्णय घेतला नाही. आता विद्यमान महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे हा प्रस्ताव प्रलंबित असून तो प्रस्ताव मंजूर करण्यात यावा, अशी मागणी आमदार रोहित पवार यांनी त्यांच्याकडे केली. त्यासाठी त्यांनी मंगळवारी मंत्री बावनकुळे यांची मंत्रालयात भेट घेऊन याबाबत चर्चाही केली. दरम्यान, एकीकडे आमदार रोहित पवार हे कर्जतच्या क्रीडा संकुलाच्या जागेसाठी पाठपुरावा करत असताना दुसरीकडे विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी क्रीडा संकुलासाठीची जागा बदलण्याची मागणी महसूलमंत्र्यांकडे केली असून त्यासाठी त्यांनी बैठकही लावली आहे. यामुळे आमदार रोहित पवार आणि विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या राजकीय खेळात कर्जतच्या क्रीडा संकुलासाठी आणखी किती दिवस वाटप पहावी लागणार आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. वास्तविक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या जन्मस्थळी चोंडी येथे मंत्रिमंडळाची नुकतीच बैठक झाली. या बैठकीतच कर्जत-जामखेड मतदारसंघातील प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली होती. परंतु त्यावेळी या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली नाही आणि आता जागा बदलण्याची मागणी सत्तेत असलेल्या सभापतींकडून केली जात असल्याने पाठपुरावा आमदाराचा आणि खोडा घालतात सभापती अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. राजकारणापायी कर्जत-जामखेडच्या एमआयडीसीला ज्याप्रमाणे ब्रेक लागला, तसे या क्रीडा संकुलाबाबत होऊ नये, अशी अपेक्षा नागरिकांकडून केली जात आहे.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# विद्यार्थ्यांचे जल्लोषात फुलांचा वर्षाव करून स्वागत!

**जालना । प्रतिनिधी -** कै. बाबुराव जाफराबादकर माध्यमिक विद्यालयांमध्ये शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे जल्लोषात मोफत पुस्तक वाटप करून स्वागत करण्यात आले.

यावेळी विद्यालयामध्ये रांगोळी, ढोल ताशा वाजवून विद्यार्थांचा जल्लोषात स्वागत सोहळा केला.यावेळी हिंदू समाज संस्थेचे संचालक डॉ.विनायक दसरे,भगवान धोत्रे शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी कुलकर्णी यांच्या हस्ते मोफत पुस्तके वाटप करण्यात आली. यावेळी शिक्षक संदीप इंगोले, भीमाशंकर कुलकर्णी, अलकनंदा गाडेकर, प्रगती भालेकर, राजाराम साबळे, मदन सोजे



कल्याणी देशमुख, वंदना नन्नवरे, सागर वाघम ारे व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# बालविकास प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत व पाठ्यपुस्तके वाटप



**जालना । प्रतिनिधी -** कसबा येथील श्रीमती प्रभावतीबाई कोळेश्वर बालविकास प्राथमिक शाळेत १६ जून रोजी शाळेच्या पहिल्या दिवशी नवागतांच्या स्वागतासह शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महिला मंडळाच्या सचिव सौ. विद्याताई कुलकर्णी या होत्या. याप्रसंगी महिला मंडळाच्या कोषाध्यक्ष सौ. सुनंदाताई बदनापूरकर, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सुजाता परदेशी यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात सौ. विद्याताई कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून नवीन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेमध्ये कब-बुलबुल व स्काऊट -गाईड वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. सहशिक्षक जॉय श्रीसुंदर यांनी महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट आणि गाईड राज्य प्रशिक्षण केंद्र रामबाग,भोर,पुणे येथे पार पडलेल्या सहा दिवशीय निवासी स्काऊट प्राथमिक प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल संस्था व शाळेच्यावतीने पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना म ान्यवरांच्याहस्ते शालेय मोफत पाठ्यपुस्तके वितरित करण्यात आली,

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्येष्ठ सहशिक्षिका श्रीमती छाया मुधोळकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका सौ. पल्लवी सरकाटे यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार सहशिक्षिका सौ. संध्या मुंढे यांनी मानले. या कार्यक्रमास शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात आगामी कालावधीत आषाढी एकादशीअसल्याने श्रीक्षेत्र पंढरपुर येथे महाराष्ट्र राज्यातुन विविध ठिकाणावरुन पायी दिंड्या मार्गक्रमण करत असतात तसेच मोहरम आदी सण, उत्सवात शहरातील मिरवणुका व विविध कार्यक्रम आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत दि. १७ ते ३० जुन २०२५ पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी जारी केले आहेत. संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश दि. ३० जुन २०२५ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मि रवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी-कर्मचाऱ्यांना तसेच उपविभागातील पोलिस अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूका, सभा, मोर्चा यांना लागू राहणार नाही,

# नोंदणी व मुद्रांक विभागातील शिपाई पदाच्या भरतीचे आयोजन

जालना । प्रतिनिधी - नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई गट-ड संवर्गात २८४ पदे भरतीसाठी दि.२२ एप्रिल २०२५ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. तरी आयबीबीएसच्या संकेतस्थावर यशस्वीरित्या भरलेले अर्ज व पात्र उमेदवारांची परीक्षा दि.१ ते ८ जुलै २०२५ या कालावधीत ऑनलाईन घेण्यात येणार आहे. परीक्षेचे प्रवेशपत्र उमेदवारांनी नोंदणी केलेल्या ई-मेलवर आयबीपीएसकडून पाठविण्यात येणार आहे. असे सह जिल्हा निबंधक वर्ग-१ व मुद्रांक जिल्हाधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**




## पान १ वरुन

### प्रशासकिय अधिकारी ...

यावे. उपविभागीय अधिकारी जालना यांनी स्वतः जायमोक्यावर न जाता तहसिलदार जालना यांना आदेशित केले. तहसिलदारांनी त्याच वेळी ४५ लाभार्थ्यांकडून जायमोक्यावर दंड चलन भरुन बँकेत जमा करुन घेतला. मात्र मोजमाप करुन दिले नाही. प्रश्न प्रलंबित राहिला. मी स्वतः १० जानेवारी २०२० रोजी उपविभागीय अधिकारी जालना यांचेकडे अपिल करुन जिल्हाधिकारी जालना यांनी २३ जानेवारी २००६ रोजी काढलेले आदेश त्यानुसार लाभार्थ्यांनी बँक चलनाने भरलेला दंड रक्कम आणि न १९६८- ६९ पासूनचे महसुल अधिकार्यांचे जायमोक्यावरील पंचनामे सोबत जोडून प्रकरण सुरु केले. उपविभागीय अधिकारी जालना यांनी प्रकरण आरएफओ करुन निकाल न देता तहसिलदार जालना यांच्याकडे वर्ग केले. त्यामध्ये

दाव्यात नसलेले ७नावे आणि दाव्यातील १ नाव सातबारावर घेतले. त्यानंतर दाव्यात नसलेले ४ नावे सातबारावर घेतली. विचारणा केली असता आम्ही आमच्या अधिकारांमध्ये काहीही करु शकतो, असे उत्तर तहसिलदार यांच्याकडून आले.

पुढे ॲड. मगरे म्हणाले की, त्यानंतर ११ नावे सातबारावर घेण्यात आले आणि आता उर्वरित काही नावे सातबारावर घेवून जी खरे लाभार्थी वगळण्यात आले आहेत. ज्या जायमोक्यावरील पंचनाम्यात उल्लेख काही लाभार्थ्यांच्या नावे जमीनी आहेत. अशा लाभार्थ्यांना आणि ज्यांचे पंचनाम्यात नावे नाहीत आणि चलन सुध्दा भरलेले नाही, असे बेकायदेशिर नावे सातबारावर तहसिलदार जालना यांनी घेतले आहेत. ही बाब उपविभागीय अधिकारी जालना आणि जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास अपिलातून आणून दिले आहे, तरी सुध्दा तहसिलदार जालना यांच्या कामकाजात काहीच फरक पडला नाही, याची चौकशी करण्याची तसदी संबंधीतांने घ्यावी. यापुढे जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी जालना येथे दारुबंदीसाठी विराट म ोर्चाचे लवकरच निश्चित करण्यात येईल, असेही मेळाव्यात निश्चित झाले आहे. या मेळाव्यास मोठ्या संख्येने दलित आदिवासी भुमिहिन कास्तपट्टे धारकांची उपस्थिती होती.

### सीटीएमके गुजराती ...

होती. उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये आरोग्याविषयी सजगता, आत्मविश्वास आणि लसीकरणाविषयी सकारात्मक दृष्टिकोन निम ाण झाला असून, पालकवर्गामध्येही या मोहिमेसंदर्भात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

### २०१२च्या आझाद ...

बजरंग दलाचे उदयभान तिवारी, कायदेशीर सल्लागार कु. सानिया शेवाळे, मानव सेवा प्रतिष्ठानचे सिद्धार्थ पाटील, भाजपचे मलबार हिल महामंत्री संतोष पालेकर, हिंदु जनजागृती समितीचे मुंबई समन्वयक बळवंत पाठक, रविंद्र दासरी, मधुसूदन आले आणि सतीश सोनार हे उपस्थित होते.

या मोर्चाबाबत अभिनेत्री स्वरा भास्कर यांनी ट्विटरवरून माहिती दिली असून डाव्या संघटनांनी मोर्चाचे आयोजन केले आहे. त्याचे स्वरूप एकतर्फी, भारताच्या परराष्ट्र धोरणाविरोधात आणि इस्रायलसारख्या मित्र राष्ट्राविरोधात आहे. हमास या दहशतवादी संघटनेने केलेल्या हिंसाचारावर हे आंदोलक मौन बाळगतात आणि उलट भारतातील मुस्लीम समाजाला चिथावणी देण्याचे काम करतात, असा आरोप समितीने केला आहे.

या आंदोलनामुळे मुंबईत पुन्हा धार्मिक तेढ व कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. हिंदूंवरील अत्याचार, काश्मिरी विस्थापन, बांगलादेशातील हिंसा किंवा भारतावरील दहशतवादी हल्ले यावर हे आंदोलक कधीच रस्त्यावर उतरले नाहीत, याकडेही समितीने लक्ष वेधले आहे. हे आंदोलन मानवतावादी नसून भारतविरोधी, हिंदूविरोधी आणि अप्रत्यक्षपणे दहशतवादास समर्थन देणारे आहे. त्यामुळेच, या मोर्च्यावर बंदी घालावी आणि आयोजकांवर कठोर कारवाई करावी, ही समितीची ठाम मागणी आहे. मुंबईकरांच्या सुरक्षेच्या आणि सामाजिक सलोख्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यावश्यक आहे.

# भाजपच्या शहराध्यक्षपदी प्रवीण सातोनकर यांची फेर निवड

### व्यापारी आघाडी राजेंद्र मस्के, दलीत आघाडीच्या नरेश कांबळे, युवा मोर्चाच्या शहराध्यक्षपदी अर्जून जगताप तर युवा मोर्चा तालुकाध्यक्षपदी संभाजी घनवट यांची निवड

**परतुर । प्रतिनिधी -** भाजपा शहराध्यक्ष पदी प्रवीण सातोनकर यांची , व्यापारी आघाडी राजेंद्र मस्के, दलीत आघाडी च्या नरेश कांबळे,युवा मोर्चाच्या शहराध्यक्षपदी अर्जून जगताप तर युवा मोर्चा तालुकाध्यक्ष पदी संभाजी घनवट, युवा मोर्चा शहर सचिवपदी रोहित जैस्वाल यांची नीवड आ . बबनराव लोणीकर भाजपा प्रदेश सचीव राहूल लोणीकर यांच्या सुचनेवरून जिल्हा अध्यक्ष नारायण कुचे यांनी नियुक्ती केले

या वेळी आ.बबनराव लोणीकर यांनी आपले विचार मांडताना सांगितले की आपण आपल्या पदाचा वापर दिन दुबळ्या गरीब सर्वसामान्या साठी योग्य वापर करावा राहूल लोणीकर यांनी म्हटले की आपण आपला पक्ष प्रत्येक घराघरात पोहचवून पक्षाने सर्व सामान्य करीता केलेली कामगीरी जनते पर्यंत पोहचवावी तर शेवटी जिल्हाध्यक्ष आ नारायण कुचे यांनी सांगीतले की आपण आपल्या पक्षाशी बांधील राहून सर्व सामान्य जनतेचे सरकार ने आणलेल्या योजनेचा लाभ मिळवून द्यावा

यावेळी सर्वांना नियुक्त पत्र देऊन त्यांना त्यांच्या पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

या प्रसंगी कार्यक्रमाला भगवानराव मोरे दया काटे सुधाकर सातोनकर पंचायत समिती सदस्य दिगंबर मुजमुले शिवाजी पाईकराव प्रदीप ढवळे तुकाराम सोळंके भाजपा माणिकराव वाघमारे, परमेश्वरा आकात बंडू मानवतकर गजानन लोणीकर,बंडू मानवतकर सिद्धेश्वर केकान, मधुकर मोरे , अमोल पवार, ज्ञानेश्वर सोळंके, गजानन लिपणे संदीप बाहेकर प्रकाश चव्हाण कृष्णा आरगडे, दिनेश होलानी, ओम प्रकाश मोर, अमोल अग्रवाल, अमर बगडिया, नरेश कांबळे,




सुरेश काळे, भगवान आरडे, मधुकर मोरे, बाबाराव थोरात बबलू सातपुते आसिफ कच्ची नसरुल्ला काकड श्री गांजाळे सुरेश जगताप, विजय यादव गोपी ठाकूर सनी तनपुरे, मेरा खतीब विश्वंभर शेळके हनुमान चिखले अशोक भांडवले कैलास यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते नागरिकांची उपस्थिती होती उपस्थित होती.

## महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या नवसंजीवनी योजनेचा पात्र खातेदारांनी लाभ घ्यावा - व्यवस्थापक राहुल पवार

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र ग्रामीण बँकेची महाग्रामीण विशेष सवलत योजना जाहिर केली असून थकीत पीक कर्ज असणार्या शेतकर्याना व्याज सवलत देऊन त्यांना पुन्हा बँकेच्या मुख्य प्रवाहात आणता येईल व पुन्हा नवीन कर्ज मिळेल, एकरकमी सवलत योजना, अशा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या रामनगर शाखेचे व्यवस्थापक राहुल शिवाजीराव पवार यांनी केले आहे.

महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या वतीने महाग्रामीण विशेष सवलत योजना जाहिर करण्यात आली असून त्यात थकबाकीदार कर्जदारांना व्याजात सवलत मिळून पुन्हा कर्ज मिळेल अजून एकरकमी सवलत योजनेचा फायदा घेऊन कर्जमुक्त होता येणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त थकबाकीदारांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक राहुल शिवाजीराव पवार यांनी केले आहे.

महाराष्ट्र ग्रामीण बँकेने नवसंजीवनी योजना, शेतकरी समाधान योजना, उद्योजक दिलासा योजना आणि गटबंधन सहाय्यता योजना सुरु केली आहे.सदरील योजनेचा लाभ घेण्याची मुदत ही ३१ जुलै असून त्यापूर्वीच लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले. याशिवाय महाराष्ट्र ग्रामीण बँकेने चालू थकबाकीदार शेतकऱ्यांना पिक कर्जासाठी एक आकर्षक व्याज सवलत योजना म्हणून महाग्रामीण किसान आधार योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत शेतकर्यांना आपले पिक कर्ज खाते नूतनीकरण करण्यासाठी व्याजात सवलत देण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र खातेदारांनी योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या रामनगर शाखेचे व्यवस्थापक श्री राहुल शिवाजीराव पवार यांनी केले आहे.




## रानमळा येथे विद्यार्थ्यांना गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप



**मंठा । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा रानमळा येथे पहिल्याच दिवशी (ता.१६) विद्यार्थांना उत्साही वातावरणात गणवेश आणि पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी इयत्ता पहिल्या वर्गात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

पहिल्याच दिवशी शाळेत मोठा उत्साह पाहायला मिळाला. शाळेच्या प्रवेशद्वारावरच रांगोळी काढून मुलांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते शालेय गणवेश ,पाठ्यपुस्तके व बूट सॉक्स वाटप करण्यात आले या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिनकरराव जावळे होते तर प्रमुख अतिथी म्हणून भास्करराव कांगणे, गणेशराव पालवे, ग्राम पंचायत सदस्य दगडू टाकरस आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभ प्रास्ताविकात शाळेतील शिक्षक कैलास उबाळे यांनी शैक्षणिक सत्र सुरू होत असताना विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन योजनांची माहिती दिली. मुख्याध्यापक प्रमोद देशमुख यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना आगामी सर्व वार्षिक कार्य योजनेची माहिती दिली. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा शाळेतील शिक्षकांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थी, पालक आणि शिक्षक उपस्थित होते.

